


# हिरव्यागार निसर्गाच्या कुशीत अध्यात्म आणि वारसाचे प्रतीक

### पावसाने खुलले सौंदर्य

यावर्षी जिल्ह्यात मान्सूनपूर्व पावसाची झालेली सुरुवात मान्सूनच्या पावसापर्यंतही कायम आहे. महिनाभरापासून सुरू असलेल्या पावसाने जिल्ह्यातील अनेक प्रकल्प भरले असून, सर्वत्र नद्यांना पाणी आले आहे. त्यामुळे अगदी श्रावणाप्रमाणे वातावरण हिरवेगार झाले आहे. निसर्गाच्या कुशीत अध्यात्म आणि वारशाच्या पाऊलखुणा असलेल्या कळंब तालुक्यातील चोराखळी येथील पापनाश मंदिराच्या परिसरातले हे मनमोहक चित्र येरमाळा येथील छायाचित्रकार सुखदेव गायके यांनी टिपले आहे.

### २ एकरावर बांधले भव्य मंदिर

चोराखळी येथील पापनाश मंदिराला ऐतिहासिक वारसा आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या आजोळी म्हणजे चोराखळी येथे सुमारे दोन एकर क्षेत्रावर महादेवाचे भव्य मंदिर बांधले असून,मंदिरासाठी तब्बल १०६ एकर जागा दिली होती. अत्यंत सुबक पद्धतीने दगडामध्ये मंदिराचे बांधकाम करण्यात आले असून, पाण्यासाठी भव्य कुंड बांधण्यात आले आहेत. हा परिसर अतिशय निसर्ग संपन्न असून, सभोवताल हिरव्यागार निसर्गाने खुलून गेलेला आहे.

### श्रावणात मोठा उत्सव

हे मंदिर अध्यात्म आणि सांस्कृतिक वारशाचे दीपस्तंभ म्हणून उभे आहे. भाविकांना आणि पर्यटकांना नैसर्गिक सौंदर्य आणि आध्यात्मिक समाधानाचे एक अनोखे मिश्रण देते. या मंदिरात श्रावण महिन्यात मोठा उत्सव असतो तर चैत्र महिन्यातही मोठी यात्रा भरते, हे मंदिर म्हणजे आमच्यासाठी अलौकिक ठेवा आहे, असे माजी सरपंच अॅड. मिराजी मैदांड यांनी सांगितले. मंदिर परिसरात आल्यानंतर प्रत्येक मन प्रसन्न होऊन जाते.

# नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेला मिळणार गती

## जिल्हास्तरीय समन्वय समिती स्थापन करण्यास मंजुरी

आरंभ मराठी | धाराशिव

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प अर्थात पोकरा टप्पा क्रमांक २ ही योजना धाराशिव जिल्ह्यातील १३८ गावात राबवली जात आहे. याची प्रक्रिया सुरू झाली असून, सध्या जिल्ह्यातील १३८ गावात सुक्ष्म नियोजन प्रक्रियेचा जागर होताना दिसत आहे. सध्या प्रत्येक गावात ग्रामसभा घेऊन या योजनेसाठी सूक्ष्म आराखडा तयार करण्यात येत आहे. राज्य सरकारने दिनांक १६ जून रोजी शासन आदेश काढून या योजनेसाठी जिल्हास्तरीय समन्वय समिती स्थापन करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे या योजनेला आता गती मिळणार असून, जिल्ह्यातील १३८ गावात योजनेची कामे जुलै महिन्यात सुरू होण्याची शक्यता आहे.

पोकरा योजनेची अंमलबजावणी व्यवस्थित व्हावी आणि योजनेचा लाभ सामान्य शेतकऱ्यांपर्यंत पोहोचावा यासाठी कृषी विभागाकडून गेल्या काही महिन्यांपासून निवड झालेल्या गावांमध्ये पूर्वतयारी केली जात आहे. ही योजना राबविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सूक्ष्म नियोजनाचा जागर प्रत्येक गावात सुरू असून, योजनेची उद्दिष्टे, योजनेचे लक्ष्य आणि नागरिकांकडून असणाऱ्या अपेक्षा या गोष्टी साध्य करण्यासाठी कृषी विभागाकडून प्रयत्न केले जात आहेत. नानाजी देशमुख कृषी संजीवनी ही योजना शेतकऱ्यांसाठी महत्वाची व महत्वाकांशी ठरणार आहे. या योजनेच्या माध्यमातून वैयक्तिक लाभासाठी ४० ते ७५ टक्के पर्यंत अनुदान कृषी विभागाच्या माध्यमातून दिले जाणार आहे. तर सामायिक घटकासाठी १०० टक्के पर्यंत अर्थसहाय्य दिले जाणार आहे. ग्रामस्तरीय सुक्ष्म नियोजन प्रक्रियेला पूर्ण करण्यासाठी वेगवेगळ्या संस्थांची मदत घेतली जात आहे. तसेच यातील विविध घटकांना प्रशिक्षण देखील दिले जात आहे. सूक्ष्म नियोजन प्रक्रियेसाठी जिल्ह्यातील १३८ गावांना वेळापत्रक बनवून दिले असून, त्याप्रमाणे प्रत्येक गावात विविध कार्यक्रमांचे आयोजन करून योजनेची अंमलबजावणी केली जात आहे. गावाच्या विकासासाठी सरपंच अध्यक्ष असलेली ग्राम कृषी संजीवनी समिती या प्रक्रियेत महत्वाची भूमिका बजावत आहे. ० ते ५ दिवसांचा कार्यक्रम या आराखड्यासाठी तयार करून नुकताच राबवला गेला. ग्राम कृषी संजीवनी समितीमार्फत आता प्रत्येक गावात ग्रामसभा घेऊन योजनेच्या अंम लबजावणीसाठी आराखडा तयार करण्यात येत आहे. या आराखड्याला अंतिम मंजुरी देण्यासाठी आवश्यक असणाऱ्या जिल्हास्तरीय समन्वय समितीची स्थापना करण्यासाठी नुकतीच राज्य सरकारने मंजुरी दिली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील १३८ गावात लवकरच योजनेची कामे सुरू होण्याच्या मार्ग मोकळा झाला आहे. जिल्हास्तरीय समन्वय समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी हे असणार आहेत तर मुख्य कार्यकारी अधिकारी सह अध्यक्ष असणार आहेत. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सदस्य सचिव म्हणून काम करणार आहेत. या समन्वय समितीत महाबीज, पशुसंवर्धन, समाजकल्याण अशा वेगवेगळ्या विभागाचे सदस्य असणार आहेत. पोकरा योजनेचा लाभ मिळवण्यासाठी जुलै महिन्यापासून प्रक्रिया गतिमान होणार असल्याचे कृषी विभागाने सांगितले.

### सूक्ष्म नियोजनाला मंजुरी देण्यासाठी जिल्हास्तरीय समिती काम करणार

१६ जून रोजीच्या शासन निर्णयानुसार जिल्हास्तरीय समन्वय समिती स्थापन करण्यास राज्य सरकारने सांगितले आहे. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती काम करणार आहे. सूक्ष्म नियोजन आराखड्याला ही समिती मंजुरी देईल. त्यानंतर जुलै महिन्यात ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू होऊ शकते.

**– रविंद्र माने**
**जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी**

### हरित धाराशिव अभियानासाठी १ जुलै रोजी विशेष ग्रामसभा

आरंभ मराठी | धाराशिव

जिल्ह्यातील वृक्षाच्छादन वाढविण्याच्या दृष्टीने जिल्हा प्रशासनाच्या पुढाकाराने १९ जुलैरोजी ''हरित धाराशिव अभियान'' राबविण्यात येणार आहे. या अभियानात जनजागृती आणि लोकसहभाग सुनिश्चित करण्यासाठी सर्व ग्रामपंचायतींना १ जुलै रोजी विशेष ग्रामसभा आयोजित करण्याचे निर्देश जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष यांनी सर्व गटविकास अधिकारी यांना दिले आहेत. राष्ट्रीय वननीतीनुसार एकूण भूपृष्ठाच्या किमान ३३ टक्के भागावर वृक्षाच्छादन आवश्यक आहे.

### विजेचा धक्का लागून मुळेवाडी येथील वृद्ध महिलेचा मृत्यू

आरंभ मराठी | तेर

धाराशिव तालुक्यातील मुळेवाडी येथील ६२ वर्षीय वृद्ध महिलेला घरामध्ये नळाच्या मोटारीचा विजेचा धक्का बसून त्या महिलेचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला. धाराशिव तालुक्यातील मुळेवाडी येथील विजयाबाई हरिश्चंद्र वराळे ही वृद्ध महिला दिनांक १८ जून रोजी सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास टिल्ल मोटारच्या वायरचा धक्का बसून जखमी झाली. या महिलेस तेर येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता विजयाबाई वराळे यांचा मृत्यू झाला.याप्रकरणी ढोकी पोलीस स्टेशनमध्ये अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून, पुढील तपास बीट अंमलदार प्रदीप मुरळीकर हे करीत आहेत.

# तुळजापूर ड्रग्ज प्रकरणात ३८ वा आरोपी ताब्यात

## राजू उर्फ पिटू सुर्वे याला अटक; सात दिवसांची कोठडी

आरंभ मराठी | तुळजापूर



तुळजापूर ड्रग्ज प्रकरणात नवीन आरोपी निष्पन्न झाला असून, सोलापूर येथील राजू उर्फ पिटू सुर्वे यास तामलवाडी पोलिसांनी गुरुवारी (दि.१९) अटक केली. त्याला न्यायालयासमोर हजर केले असता सात दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली. याबाबत अधिक माहिती अशी की, राज्यभर चर्चेत असलेल्या तुळजापूर येथील ड्रग्स प्रकरणात आत्तापर्यंत एकूण ३७ आरोपी निष्पन्न झाले होते. त्यामध्ये एका नवीन आरोपीची भर पडली असून ३८ व आरोपी म्हणून सोलापूर येथील बुधवार पेठेतील रहिवासी असलेला राजू उर्फ पिटू सुर्वे यास पोलिसांनी अटक केली. आत्तापर्यंत या प्रकरणात २१ जणांना अटक करण्यात आली आहे तर १६ जण फरार असून एकास अटकपूर्व जामीन मिळालेला आहे. फरार आरोपींचा शोध पोलीस घेत आहेत. दरम्यान नवीन आरोपी निष्पन्न झाल्याने आणखी काही आरोपी निष्पन्न होण्याची यामध्ये शक्यता निर्माण झाली आहे. या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस अधीक्षक रितू खोकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलिस अधिकारी निलेश देशमुख व तामलवाडीचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गोकुळ ठाकूर हे करत आहेत.

### खासदार ओमराजे यांनी केला होता उल्लेख

काही दिवसांपूर्वी घेतलेल्या पत्रकार परिषदेत खासदार ओमराजे निंबाळकर व आमदार कैलास पाटील यांनी सोलापूर येथील पिटू सुर्वे यांचा नामोल्लेख ड्रग्ज प्रकरणात असल्याचा गौप्यस्फोट केला होता. तसेच मुंबई येथील अतुल अग्रवाल याचे नाव देखील त्यांनी घेतले होते. त्यानंतर यामध्ये राजू उर्फ पिटू सुर्वे यास अटक झाली आहे.

# शिराढोण-कोल्हेगांव रस्त्याच्या दुरुस्ती कामाला सुरुवात

**आरंभ मराठी IMPACT**

## ग्रामस्थांची गैरसोय संपणार, आरंभ मराठीच्या वृत्ताची दखल



आरंभ मराठी | शिराढोण



अतिशय महत्वाचा व जिल्हयाला जाण्यासाठी महत्वपुर्ण असलेल्या शिराढोण-कोल्हेगांव जिल्हा मार्गाची दुरावस्था, खड्डेमय रस्त्यावरुन करावा लागतोय जीवघेणा प्रवास या मथळयाखाली दै.आरंभ मराठीने वृत्त प्रकाशित करुन या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधले होते. यानंतर अखेर १८ जुन रोजी या रस्त्याच्या दुरुस्तीच्या कामाची सुरुवात करण्यात आली आहे.

या रस्त्याच्या दुरावस्थेमुळे नागरिकांचे मोठ्या प्रमाणात हाल होत होते. दैनिक आरंभ मराठीने या प्रश्नाला वाचा फोडल्यानंतर चार महिन्यांनी प्रशासनाला जाग आली असून, आता रस्ता दुरुस्तीचे काम हाती घेतले आहे. शिराढोण- कोल्हेगांव हा रस्ता जिल्हा मार्ग म्हणून ओळखला जातो. या मार्गावर साखरकारखाने वाहतूक तसेच इतर कारखान्यांचीही वाहतूकीची सततची वर्दळ असते. रस्ता अतिशय अरुंद असल्यानेया रस्त्यावर सातत्याने वाहतूकीची कोंडी पहावयास मिळते.



दैनिक आरंभ मराठी
19 Feb 2025 - Page 4
epaper.arambhmarathi.com

**शिराढोण-कोल्हेगाव जिल्हा मार्गाची दुरवस्था**

**खड्डेमय रस्त्यावरुन करावा लागतोय जीवघेणा प्रवास**

अमोलसिंह चंदेल । आरंभ मराठी

शिराढोण : शिराढोण-कोल्हेगाव-ढोकी हा मार्ग शिराढोण व परीसरातील खेडयांचा अतिशय महत्वाचा मार्ग आहे. या रस्त्याची दुरवस्था झाली असून रस्त्यावर मोठे खड्डे पडले आहेत. या रस्त्यावरुन प्रवास करताना नगरिकांना जिव

शिराढोण- कोल्हेगाव रस्ता हा प्रचंड वर्दळीचा रस्ता आहे. या रस्त्याला शिराढोण व परीसरातील गावे जिल्हामार्ग असे म्हणतात. या रस्त्यावरील वर्दळ लक्षात घेता रस्त्याचे दुरुस्तीचे काम वर्षभरापुर्वी सरु करण्याच्या उद्देशाने या अरुंद असलेल्या रस्त्याच्या बाजूने दगडाचे ढिगारे टाकण्यात आले आहेत. परंतू या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम प्रत्यक्षात मात्र सूरु झाले नाही. आगोदरच अरुंद रस्ता त्यात रस्त्यावर पडलेले मोठे मोठे खड्डे आणि आता दुरुस्तीच्या नावाखाली रस्त्याच्या कडेला टाकलेले हे दगडांचे ढिगारे यामुळे तर या रस्त्यावरुन दुचाकीवरुन प्रवास करणारे शेतकरी, विद्यार्थी तसेच इतर नागरीक यांना धोका निर्माण झाला आहे. या भागात साखर कारखाने असल्याने उसाच्या वाहनांची मोठ्या प्रमाणत याच रस्त्यावरुन

**वाहतूकीची होतेय कोंडी**

रस्ता अरुंद असल्यामुळे व एका बाजूला दगडांचे ढिगारे टाकल्याने रस्ता जास्तच लहान झाला आहे. एखादे उसाने भरलेले ट्रॅक्टर रस्त्यावरुन जात असताना त्यामागील वाहणांना त्याच गतीने ट्रॅक्टरच्या मागे तब्बल २ ते ३ किमी जावे लागते. त्यामूळे या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूकीची कोंडी सातत्याने निर्माण होत आहे.

**रस्त्याचे काम तात्काळ सूरु करा अन्यथा आंदोलन**

शिराढोण - कोल्हेगाव रस्ता हा शिराढोणसह २० ते २५ गावांना अतिशय महत्वाचा रस्ता असून या रस्त्यावर मोठे-मोठे खड्डे पडले आहेत. तसेच दूरुस्तीच्या नावाखाली रस्त्याच्या कडेला दगडाचे ढिगारे टाकल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. सदरील रस्त्याचे काम तात्काळ सूरू न केल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल.

### रस्त्याचे रुंदीकरण होणे आवश्यक

रस्त्यावरील वर्दळ व वाहतूक पाहता सदरील रस्त्याचे रुंदीकरणही करणे गरजेचे आहे. हा रस्ता जिल्हयाला जाण्यासाठी महत्वपूर्ण रस्ता आहे. या रस्त्यावर अनेकवेळा वाहतूकीची कोंडी निर्माण होते. हा सर्व विचार करता सदरील रस्त्याचे रुंदीकरण होणे अत्यंत गरजेचे आहे. रुंदीकरण झाल्यास वाहतूक सुरक्षित होऊन अपघातांचे प्रमाण कमी होऊ शकते.

### नागरिकांनी मानले आरंभ मराठीचे आभार

दै.आरंभ मराठीच्या वृत्तानंतर पुन्हा आवाड शिरपूरा गावचे सरपंच गोविंद आवाड यांनी जिल्हाधिकारी तसेच बांधकाम विभागास निवेदन देवून तीव्र आंदोलन करण्याचा ईशाराही दिला होता. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचे धाराशिव समिती सदस्य नितीन पाटील यांनीही मंत्रालय स्तरावर या रस्त्याच्या प्रश्नासाठी पाठपुरावा केला होता. त्यासोबच शिराढोण येथील भृष्टाचार निर्मुलण संघर्ष समितीचे जिल्हा उपाध्यक्ष सुनिल पांचाळ यांनीही आंदोलन करण्याचा ईशारा दिला होता. या सर्व बाबींचेही दै. आरंभ मराठीने वृत्त प्रकाशीत केले होते. या सर्व पाठपुराव्यामुळे या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम सूरु झाले आहे. या बाबत सरपंच आवाड व दै.आरंभ मराठीचे सर्वत्र आभार मानले जात आहेत.

अनेकांनी या खड्डेमय रस्त्यावरुन जीवघेणा प्रवास करत आपला जीवही गमावला आहे. अतिशय महत्वपुर्ण असलेल्या या रस्त्याच्यादुरुस्तीचे काम मंजूर असूनही अनेक दिवसांपासून प्रलंबित होते. तब्बल एक ते दीड वर्षापासून रस्ता दुरुस्तीच्या नावाखाली रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी दगड व खडीचे ढिगारे टाकलेले होते. या दगडाच्या ढिगाऱ्यांमुळे तर हा रस्ता खुपच अरुंद झाला होता. या रस्त्यावरुन दुचाकी तसेच चारचाकी वरुन प्रवास करताना तारेवरची कसरत करावी लागत होती. या सर्व बाबी दै. आरंभ मराठीने वृत्त प्रकाशीत करुन समोर आणल्या होत्या. याची दखल घेत अखेर या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम सुरु करण्यात आले आहे.

### ६ आणि १३ वर्षांच्या सख्ख्या बहिणींवर अत्याचार

# ७९ वर्षाच्या नराधमाला सक्तमजुरी

आरंभ मराठी | धाराशिव

६ आणि १३ वर्षांच्या सख्ख्या बहिणींवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी ७९ वर्षांच्या आरोपीला पॉक्सो कायद्यांतर्गत कळंब न्यायालयाने पाच वर्ष सक्तमजुरी आणि दंडाची शिक्षा सुनावली आहे. कळंब तालुक्यात घडलेल्या या घटनेनंतर जिल्ह्यात संतापाची लाट उसळली होती.आरोपी साहेबराव बोबडे (वय ७९) यास पाच वर्षे सक्त मजुरी व ३ हजार रूपये दंड तसेच दुसऱ्या कलम ंतर्गत १ वर्ष सक्त मजुरी व १ हजार रूपये दंड अशी शिक्षा कळंब जिल्हा व सत्र न्यायाधीश आर. के. राजेभोसले यांनी सुनावली.खटल्याची माहिती अशी की, २६ नोव्हेंबर २०२० ते २९ नोव्हेंबर २०२० या दरम्यान आरोपी साहेबराव नारायण बोबडे (वय ७९, रा. कोथळा, ता. कळंब) याने घरामध्ये बोलावून अल्पवयीन बहिणींवर अत्याचार केला. तसेच पीडितांच्या घरामध्ये कोणी नसताना त्याचा गैरफायदा घेवून त्यांच्या घरामध्ये शिरून दोन्ही अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार केला. याप्रकरणी पिडितेच्या आईच्या तक्रारीवरून शिराढोण पोलिस ठाण्यात आरोपी साहेबराव बोबडेविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला होता. कलम ३७६ तसेच बाल लैंगिक अपराधापासून संरक्षण २०१२ अंतर्गत कलम ४, ८, १०, १२ व कलम ४५२ भादंवि याप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता. याचा तपास शिराढोण पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक जी. व्ही. गोडसे यांनी पूर्ण करून दोषारोपपत्र कळंब येथील जिल्हा व सत्र न्यायालयात दाखल केले होते. त्यानुसार न्यायालयामध्ये सरकारी पक्षातर्फे एकूण १३ साक्षीदार तपासण्यात आले. यामध्ये १३ वर्षीय पीडित मुलगी आणि ६ वर्षीय पीडित अल्पवयीन मुलींची साक्ष महत्वपूर्ण ठरली. तसेच अतिरिक्त सरकारी वकील अॅड. अशिष कुलकर्णी यांचा युक्तीवाद ग्राह्य धरून आरोपीस पाच वर्षे सक्त मजुरी व ३ हजार रूपये दंड व दुसऱ्या कलमांतर्गत १ वर्ष सक्त मजुरी व १ हजार रूपये दंड अशी शिक्षा कळंब जिल्हा व सत्र न्यायाधीश आर. के. राजेभोसले यांनी सुनावली.

### विक्रीसाठी जाणारे एक टन गोमांस पकडले; तिघांवर गुन्हा

आरंभ मराठी | परंडा

विक्रीसाठी नेण्यात येणारे एक टन गोमांस परंडा पोलिसांनी पकडून तिघांवर कारवाई केली. यासंबंधी सविस्तर वृत्त असे की, आरोपी मुद्दशीर इब्राहिम कुरेशी (वय २४ वर्षे), मुद्दशीर खाजा शेख (वय २५ वर्षे) आणि सरुराज बब्बु कुरेशी (वय ३४ वर्षे, रा. कुरेशी गल्ली, परंडा) या तिघांना दिनांक १८ जून रोजी बावची शाळेच्या पुढे रुई रोडवर रोडवर गोवंशीय जनावरांचे दोन लाख रुपये किंमतीचे एक टन गोमांस घेऊन जात असताना पोलिसांनी ताब्यात घेतले. आरोपी काळ्या रंगाच्या इर्टीगा कारमध्ये (क्र. एमएच १४ ईएच ३०३०) जनावरांची अवैध कत्तल करून ते विक्री करीता घेवून जात असताना परंडा पोलीसांना मिळून आले. यावेळी पोलिसांनी वाहनासह एकूण नऊ लाखांचा मुद्देमाल जप्त केला. यावरून पोलीसांनी सरकारतर्फे नमूद

# सारे सुखात देती,हातात हात माझ्या, दुःखात कोण नाही जवळून जात माझ्या

आरंभ मराठीच्या रसिक वाचकांना नमस्कार. काव्यारंभ या कवितेची आस्वादक समीक्षा किंवा रसग्रहण करणाऱ्या या सदराचे हे विसावे पुष्प आहे

हे पुष्प मी मंगरूळ तालुका तुळजापुरच्या कवयित्री सौ. अनुराधा रत्नाकर उपासे मस्के यांच्या कविता, गझल व अभंग रचनांनी गुंफणार आहे.

सौ अनुराधा रत्नाकर उपासे यांचे शिक्षण बी एस सी,त एम ए मराठी, झालेले आहे.

गृहिणी असलेल्या अनुराधा उपासे यांचा त्यांच्या कवितांचा *बहर *काव्य संग्रह प्रकाशित आहे.

त्यांना
हिरकणी साहित्य गौरव पुरस्कार
हिरकणी बहुउद्देशीय संस्था, जालना कडून (पंढरपूर येथे)
बहिणाबाई चौधरी राज्यस्तरीय पुरस्कार ,(ओव्या साठी)
नवदुर्गा हिरकणी पुरस्कार
काव्य भुषण साहित्य भुषण, काव्य रत्न (अष्टपैलू कला अकादमी मुंबई)
नारी रत्न (जामनेर येथे)
लेखणी सम्राज्ञी
सदिच्छा शिरोमणी
.काव्य शिरोमणी
पोयट ऑफ द वीक किताब
ऑथर ऑफ द वीक किताब (महाराष्ट्र साहित्य मंच),
अष्टविनायक, बारा ज्योतिलिंग, नवदुर्गा असे अनेक पुरस्कार मिळालेले आहेत.

महाराष्ट्रातील पुर्ण संतांवर अभंग रचना करून सर्वोत्कृष्ट, उत्कृष्ट,भावस्पर्शी प्रथम,द्वितीय, तृतीय असे अनेक स्पर्धेत क्रमांक मिळवले आहेत.

दिवाळी अंकात त्यांच्या कथा कविता प्रकाशित आहेत.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन ९३वे , काव्य वाचन व सुत्र संचालन (धाराशिव) त्यांनी केलेले आहे.

उदगीर येथील अखिल भारतीय साहित्य संमेलन मध्ये जेष्ठ साहित्यिक श्री रवींद्र शोभणे यांच्या हस्ते त्यांच्या काव्य संग्रहाचे प्रकाशन झालेलेआहे.

अनुरत्न या नावाने त्या लिखाण करतात.

अभंगरचना हा त्यांच्या आवडीचा प्रांत आहे, त्याचीच साक्ष त्यांचे विठुमाऊली आणि शिव शंभू हे अभंग देतात.

तर त्यांच्या
कल्लोळ रोज जाती धर्मात होत आहे
माणूसकी असावी कायम मनात माझ्या
या गझलेच्या ओळी मनात रेंगाळत राहतात.

अभंग, गझलरचने बरोबरच कवयित्रीचे कविता व ओव्या लेखनपण वाचण्यासारखे आहे.

सासर माहेरच्या त्यांच्या ओव्या बघा, त्या म्हणतात,
घरघर जाते फिरता, पीठ पांढरे शुभ्र पडे
आठवती संस्काराचे आईने दिले धडे

तर बळीराजा या कवितेत त्या म्हणतात.
येईल रे देवाला बी
कधीतरी तुझी कीव
येतीम दिवस सुखाचे
वाया नको घालवू जीव:
तर अशा या सुंदर रचनांचा आपणआस्वादघेऊया.



डॉ. रेखा अनिल ढगे

काव्यारंभ

## विठू माऊली

राणा पंढरीचा। सावळे ते रुप।
किती अपरुप। भक्तांना ही।१।

विठूचा गजर ।।पंढरीची वारी।।
पायी पायी करी।। वारकरी२।

मुखी विठूनाम ।गळ्यामध्ये माळ।
हातात तो टाळ। वाजवत।।

विठू माऊलीचा। गजर करत।
पंढरपुरात। जाती भक्त।३।

विठूराया तुझ्या। दर्शनाची आस ।
मनोमनी ध्यास ।सदोदित।४।

घरातच आज ।ही मानस पुजा।
भाव नाही दुजा ।विठूराया।५।

सावळे ते रुप। कटी पितांबर।
उभा विटेवर ।विठू माझा।६।

तुळशीची माळ। दोन्ही हात कटी।
चंदनाची उटी ।शोभतसे।७।

पंढरीचा राणा। अंतरी वसतो।
संकटात देतो। साथ सदा।८।

धाव विठूराया । रहा भक्ता पाठी
चिंता मुक्ती साठी ।अनु म्हणे।९।

## सासर माहेर

जाते पाहता आठवे ,आई दळत ते दीस
पहाटेला उठूनिया ,गाणे जात्यावर खास

जावा जावा दळताना गोड ओव्या त्या गात
नाते सासर माहेराचे ,गुंफे कौतुके ओव्यात

दळण दळताना घास घाली जात्याच्या मुखात
सांगे आईस ओवीतून,आहे सासरी सुखात

घरघर जाते फिरता ,पीठ पांढर शुभ्र पडे
आठवतात संस्काराचे आईने दिलेले धडे

देवा दंडवत तुला ,राहो सौभाग्य अखंड
धनी माझ्या भ्रताराला,औक्ष मिळो रे उदंड

नाही ऐकू येत आता,जात्याची ती घरघर
ओवी गाणारी ती माय,तीही गेली फार दूर
अनुरत्न

## आहेस तु मन मंदिरात माझ्या

सारे सुखात देती हातात हात माझ्या
दुःखात कोण नाही जवळून जात माझ्या

कल्लोळ रोज जाती धर्मात होत आहे
माणूसकी असावी कायम मनात माझ्या

वागो कुणी कसेही समजून घेत आले
विसरून सर्व गोष्टी रमते जगात माझ्या

आले कशात अपयश हारत कधीच नाही
पुन्हा नवी उभारी येते यशात माझ्या

देवा तुला कशाला शोधू असे कुठेही
आहेस तू तसाही मनमंदिरात माझ्या

## शिवशंभू

सदाशिव भोळा। आसे जटाधारी।
गंगा वसे शिरी ।शिवशंभू।१।

चंद्रमा कपाळी ।गळी रुद्र माळा।
वासुकी ती गळा। शोभतसे।२।

त्रिशूळ डमरू। कमंडलू हाती।
भस्म ते लावती। अंगावरी।३।

कैलाशीचा राणा। पार्वतीचा पती।
पुत्र गणपती। विद्या देई।४।

सांब सदाशिवा। कृपा भक्तांवरी।
दिनांचा कैवारी ।तूच हरी।५।

बेलपत्र पिंडी ।कटी व्याघ्रंबर।
हा शिवशंकर ।सदाशिव।६।

नमन तुजला। देवा महादेवा।
संकटाशी धावा। भोलेनाथा।७।

छान शब्दफुले । गुंफीली अनुने।
वाहिली प्रेमाने ।चरणाशी। ८।

तुच पाठीराखा। देवा महादेवा।
आशिष हा हवा। निरंतर।९।

## साऱ्या जगाचा पोशिंदा

राब राब राबतो
घाम गाळून शेतात
सोन कष्टानं पिकवतो

काय सांगु व्यथा खरी
माझ्या बळीराजाची
कधी निसर्ग कोपतो
परिस्थिती हाता बाहेरची

भुक वेदना पोटाची
मनी काळजी घराची
सदा कर्ज माथ्यावरी
चिंता आसते लेकरांची

कधी पिकली शेती
भाव नाही पिकाला
उभारीन करतो सार
नाही घालत भीक
सरकारच्या आश्वासनाला

नको नको खचू राजा
नको हातात दोरी
वाट पाहतात तुझी
बायको,लेकर ,सारी

येईल रे देवाला बी
कधीतरी तुझी कीव
येतील दिवस सुखाचे
वाया नको घालवू जीव

## गझल

म्हणतात प्राणवायू आता हवेत नाही
झाडास तोडताना लक्षात येत नाही

स्वार्थास पोसताना मोहास अंत नसतो
गरजूस साथ आता कोणीच देत नाही

मागीतले नभाला मी दान पावसाचे
वेळेस यायचा त्याचा आज बेत नाही

विश्वास घात करतो कोणी सहज कसाही
विश्वास पात्र येथे कोणी सचेत नाही

बरबाद होत आहे ही नव पिढी नशेने
ताबा तसा मनावर दिसला नशेत नाही

शेतात पिकवतो तो राबून अन्नदाता
कष्टास कोण त्यांच्या जाणून घेत नाही

खोट्या गुणास गाणे रीतच जगात आहे
सत्यास साथ देण्या माणूस येत नाही

## आनंद कंद

सोडून दूर गेली स्वर्गात माय माझी
अक्षय अशीच आहे ह्रदयात माय माझी

शिकली जरी न शाळा विद्वान फार होती
रुजवून मूल्य गेली आम्हात माय माझी

घासातलाच देई गरजूस घास आई
होती श्रीमंत इतकी दानात माय माझी

सांभाळलीत नाती स्नेहात खूप सारी
आहेच त्यामुळे तर स्मरणात माय माझी

सा-या जगात न्यारी नाही तिला उपाधी
वर्णू तरी कुण्या मी शब्दात माय माझी

कष्टात घेत गेली आनंद सर्वथा ती
थकली कधीच नाही कामात माय माझी

भजना मधे कधी तर ती देवळात रमली
नव्हती कधी कुणाच्या तंटयात मायमाझी

फोटोत आज आहे पण लक्ष लेकरावर
तेथून पाहते ती साक्षात माय माझी
अनुरत्न





सौ अनुराधा रत्नाकर उपासे
मंगरूळ ता तुळजापूर
जिउस्मानाबाद.

## माजी सैनिकांच्या मुलांकरिता अग्निवीर सैन्य भरतीची संधी

आरंभ मराठी |धाराशिव

दिनांक २३ ते २८ जून २०२५ या कालावधीत महार रेजिमेंट सेंटर, सागर येथे माजी सैनिक पाल्याकरिता अग्निवीर सैन्य भरती (युनिट हेडक्वाटर कोटा) होणार आहे. तरी जिल्ह्यातील माजी सैनिक पाल्यांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा.असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

## नैतिकता व गुणवत्ता यांचा आधार

### आयुर्वेद महाविद्यालयात शैक्षणिक चर्चासत्र

आरंभ मराठी |धाराशिव

शासकीय आयुर्वेद महाविद्यालयधाराशिव येथील अगदतंत्र विभागाच्या वतीने Good Clinical Practices (GCP) नैतिकता व गुणवत्ता यांचा आधारया विषयावर शैक्षणिक चर्चासत्र नुकतेच आयोजित करण्यात आले. होते.नैतिकता व गुणवत्ता यांचा आधार यावर आंतरराष्ट्रीय नैतिक आणि कायदेशीर मानकांची माहिती देण्यात आली. आचार्य सुश्रुत चरकांच्या नैतिक दृष्टिकोनासह आधुनिक कायदे आणि रुग्णहक्क यांचा अभ्यास करण्यात आला.औषधी वनस्पती भेटवस्तू देण्याच्या अभिनव उपक्रमाला प्रारंभ करण्यात आला. या प्रसंगी विभागाच्या नवीन लोगो व 'पथ्य-अपथ्य' माहितीपत्रकाचे अनावरण अधिष्ठाता डॉ.एन.एस. गंगासागरे यांच्या हस्ते झाले.विभाग प्रमुख डॉ.शितल कोपर्डे व डॉ. रेणुका देशमुख यांनी आयोजनाची जबाबदारी सांभाळली.कार्यक्रमात विविध प्राध्यापकांनी अभ्यासपूर्ण सादरीकरण केले. विद्यार्थ्यांसाठी नैतिकता व गुणवत्ता यांचा आधार यावर आधारित ऑनलाईन परीक्षा घेण्यात आली व सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले.अधिष्ठात्यांनी विद्यार्थ्यांनी गुणवत्ता व नैतिकतेचे मूल्य अंगीकारून वैद्यकीय सेवा बजावावी,असे आवाहन केले.

# साहित्यिक पूर्ण वेळ काम कधी करतील?

**सोलापूर** येथे अलीकडेच एक प्रेरणादायी कार्यक्रम पार पडला. सदाशिव बेडगे या वाचन चळवळीत मागील ३० वर्षांपासून झोकून देऊन कार्य करणाऱ्या कार्यकर्त्याला सन्मानपत्र देण्यात आले. पंढरपूरचे वाचनप्रेमी संतोष चौंडावार यांनी आपला वाढदिवस दरवर्षीप्रमाणे याही वर्षी एका वेगळ्या पद्धतीने साजरा करत सदाशिव बेडगे यांना ₹११,००१ ची देणगी देत सन्मानपत्र प्रदान केले. कवी माधव पवार यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम संपन्न झाला.

या प्रसंगी बोलताना माधव पवार यांनी एक महत्त्वाची खंत व्यक्त केली. ते म्हणाले, ''लेखक, कवी हे आपल्या तत्वांवर ठाम असतात. ते कोणापुढेही भीक घालत नाहीत. मात्र आज त्यांना स्वतःच्या चरितार्थासाठी नोकरी वा व्यवसाय करावा लागतो, ही मोठी शोकांतिका आहे.'' त्यांचं म्हणणं अगदी खरं आहे साहित्यिकांनी पूर्ण वेळ लेखन करावं, असं अपेक्षित आहे. मात्र वाचनसंस्कृती मोबाईल, इंटरनेट आणि इतर मनोरंजनाच्या साधनांमुळे क्षीण झाली आहे.ते पुढे म्हणाले, ''मी आशावादी आहे की पुन्हा वाचन चळवळ जोर धरेल.'' त्यांच्या बोलण्यातून स्पष्ट होते की आपल्या देशात हाताच्या बोटावर मोजण्या इतकेच लेखक, कवी, संशोधक आणि इतिहासकार पूर्ण वेळ लेखनकार्य करू शकतात. बहुतेकांना उदरनिर्वाहासाठी इतर कामे करावी लागतात. त्यामुळे ते संपूर्णपणे वाचन, लेखन, चिंतन आणि सर्जनशीलतेला देऊ शकत नाहीत, हे खरंतर समाजाचंच नुकसान आहे. प्रबोधनकाळातील युरोपातील चित्रकार लिओनार्दो दा विंची म्हणतो, ''ज्ञान, प्रतिभा आणि कला यांशिवाय केवळ संपत्ती व्यर्थ आहे. साहित्य, संगीत, कला व ज्ञानविरहित श्रीमंतांने जर माझे चित्र पाहिले तर तो माकडाप्रमाणे नाकाला लावेल किंवा हा खाद्यपदार्थ आहे का म्हणून विचारेल.'' खरंच आज हा विचार ५०० वर्षानंतर सुद्धा खरंतर जसाच्या तसा लागू होतो. माणसाला माणूस घडवण्याचं काम लेखक करतो. साहित्यिकांनी, कलाकार आणि विचारवंत अभ्यासक यांनी आपले काम जर थांबवले तर समाजात अराजकता माजेल. माणसाला पशु होण्यापासून खरच हे लोक वाचवत असतात. लेखकाचे काम समाजाला दिशा देण्याचे आहे. प्रबोधन करण्याचे आहे. वास्तवदर्शी मांडणी करून जे चुकत आहे ते दाखवण्याचे काम साहित्यिक आणि कलावंत करतात.

ते वास्तवदर्शी मांडणी करून जे चुकतंय ते दाखवतात, समाजाची अभिरुची वाढवतात आणि जीवनाचं मर्म शोधण्याचं कार्य करतात. गोविंद तळवलकर यांनी अभिजात कलेबाबत म्हटलं आहे, ''ज्या कलाकृतीकडे आपण सुखदुःखाच्या क्षणी वारंवार वळतो आणि प्रत्येक वाचनाच्या वेळी त्या नव्या अर्थाने आपल्याला साद घालतात, त्या खऱ्या अभिजात कलाकृती असतात.'' त्यांनी ललित, वैचारिक अशा सर्व लेखनप्रकारांना आणि कलांना अभिजात ठरवलं आहे.

साहित्य माणसाच्या दुःखावर फुंकर घालणारं आणि आनंद द्विगुणित करणारं असतं. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात विशिष्ट धारणा असतात; या धारणा कधी चुकीच्या असतात. त्या दुरुस्त करण्याचं आणि नव्या मूल्यांची पेरणी करण्याचं काम साहित्यिक करतात. सती प्रथा पासून ते नरबळी पर्यंतच्या अनेक प्रथांवर लेखकांनी आपल्या लेखन्या झिजवल्या आहेत. शास्त्रीय आणि तर्कशुद्ध विचारांना प्राधान्य दिले आहे. परंतु हे करताना त्यांना अनेक अडचणींना त्यांना सामोरं जावं लागतं. वस्तुस्थिती मांडताना प्रस्थापितांचे हितसंबंध दुखावले जातात. लेखकांना धमक्या, छळ, टीका सहन करावी लागते. अनेक विचारवंतांना तर आपला जीवही गमवावा लागला आहे.



- किशोर जाधव
सोलापूर
मो. ९९२२८८२५४१

भारतीय संविधानाने प्रत्येकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिलं असलं, तरी तर्कशुद्ध विचार, स्पष्टता, आणि नितळ मांडणी ही प्रत्येकाच्या अंगी नसते. लेखक, कवी, कलावंत हीच जबाबदारी निभावतात. ते आपल्या कल्पना, आदर्श आणि मूल्यं समाजासमोर ठेवतात.

लेखक आयुष्यभर आदर्शवादाची मशाल घेऊन चालत असतो. म्हणूनच लेखकांना पूर्ण वेळ, प्रोत्साहन आणि सुरक्षितता मिळाली पाहिजे. कवी माधव पवार यांची ही अपेक्षा अत्यंत योग्य, रास्त आणि काळाच्या गरजेची आहे.

# पर्यावरणात मानवी अतिरेक वाढल्यामुळेच दुर्घटना

**दिवसेंदिवस** ज्याप्रमाणे अत्याधुनिक सुविधा निर्माण होत आहेत, त्याच्या दुप्पट विनाशाचे दरवाजे उघडल्याने दुर्घटनांच्या प्रमाणात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. ही स्थिती फक्त भारतातच नसुन संपूर्ण जगभर दिसुन येते.

महत्वाचे म्हणजे जगभरातील अनेक देशात २०२५ मध्ये भयावह युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाल्याचे दिसून येते व अनेक भयावह दुर्घटना पहायला मिळत आहेत आणि दुर्घटनांची साखळी सुरूच आहे. म्हणजे आजच्या परिस्थितीत पृथ्वीवरील मानव, पशुपक्षी व संपूर्ण जीवजंतू अत्यंत कठीण परिस्थितीत जगत असल्याचे दिसून येते. आपण म्हणतो की, आकाशातील प्रवास (विमानप्रवास) सर्वात सुरक्षित असल्याचे जगजाहीर आहे. परंतु, आज विमान दुर्घटनांचे प्रमाण सुध्दा मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसून येते. दिनांक १२ जूनला गुजरात मधील अहमदाबाद विमान दुर्घटना अत्यंत भयावह होती. विमानाने उड्डाण घेताच ३० सेकंदात एका मेडिकल होस्टेलवर कोसळले.

यात विमानातील २४१ प्रवाशांचा मृत्यू झाला व होस्टेलमधील अनेक विद्यार्थीचा मृत्यू झाला व अनेक गंभीररीत्या जखमी झाले. त्यामुळे आता प्रश्न निर्माण होतो की, विमानाने प्रवास चांगला की वाईट. आपण हेलिकॉप्टर सुरक्षित समजतो परंतु हेलिकॉप्टरच्या दुर्घटनांचे प्रमाण सुध्दा वाढले आहे. याचे जिवंत उदाहरण म्हणजे दिनांक १२ तारखेला केदारनाथ दर्शनासाठी गेले असता दर्शनानंतर ते आर्यन एव्हिएशनच्या हेलिकॉप्टरने गुप्तकाशीकडे निघाले असताना अचानक हवामान बदलले. दाट धुके व अवकाळी पावसामुळे दृश्यमानता कमी झाल्याने हेलिकॉप्टर जंगलात कोसळले. यात एकूण ७ प्रवास्यांचा मृत्यू झाला. म्हणजे सध्याच्या परिस्थितीत निसर्ग सुध्दा मानवाच्या अतीरेकाला त्रासल्याचे दिसून येते व त्यामुळे दुःखद घटना घडतांना दिसतात.अशा परिस्थितीत प्रश्न



उपस्थित होतो की आपल्यासाठी काय सुरक्षित आणि काय सुरक्षित नाही?मावळ तालुक्यातील प्रसिद्ध कुंडमळा येथे १५ जून रोजी पर्यटकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.येथील इंद्रायणी नदीवरील असलेल्या ३२ वर्षे जुन्या पुलावर क्षमतेपेक्षा जास्त नागरिकांच्या गर्दीमुळे पुलाचा मधला भाग अचानक कोसळला.सुमारे ३५-४० जण पुलावरून कोसळल्याने जखमी झाले असून चौघांचा मृत्यू झाला ६ जणांची प्रकृती अत्यंत गंभीर आहे आणि नदीचा प्रवाह जास्त असल्याने अनेक जण वाहून सुध्दा गेल्याचे सांगितले जाते. अशाप्रकारे निसर्ग सर्वांचीच गोची करतांना दिसते. २२ एप्रिल २०२५ ला पहलगाम येथील शांतमय ठिकाणी पर्यटक आनंद लुटण्यासाठी गेले असता अचानक आतंकवाद्यांनी पर्यटकांवर हल्ला केला यात २८ जणांचा निर्घृणपणे हत्या करण्यात आली.म्हणजे आजच्या परिस्थितीत एकांतवास सुध्दा कठीण झाला आहे.याचप्रमाणे दिवसेंदिवस रेल्वेचे सुध्दा अपघात वाढल्याचे दिसून येते. नुकताच मुंबई येथे लोकल ट्रेनचा अपघात झाला यात अनेकांचा बळी गेला.त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत मानवजातीसाठी कोणतेही ठिकाण सुरक्षित नसल्याचे दिसून येते. आता तर नौकरीवर जातांना,बाहेर जातांना, पायदळ फिरतांना सुध्दा आपण सुरक्षित आहोत की नाही याचीही शंका निर्माण झाली असून चिंता वाटायला लागली आहे.याही पलीकडे आपण विचार केला तर देवदर्शन किंवा फिरणेही महागात पडतांना दिसत आहे.त्यामुळे प्रश्न निर्माण होतो की ''जाये तो जाये कहा!''आतातर इस्राईल -इराण युद्ध आरपारचे समजले जात आहे. यामुळे तिसऱ्या महायुद्धाचे सावट निर्माण झाले आहे.कारण युक्रेन-रशिया संघर्ष सुरूच आहे सोबतच अनेक देशात गृहयुद्ध भडकल्याचे दिसून येते.सध्याचे युध्द साधे राहिले नसुन बॉम्ब वर्षाव, ड्रोन हल्ला, मिसाईल अशाप्रकारे अत्याधुनिक शस्त्रास्त्रे वापरले जात आहेत. सध्याच्या परिस्थितीत युक्रेन, रशिया, ईरान,इजरायल यांच्या युध्दामुळे सर्वत्र आगीचे सावट दिसून येते.यामुळे लाखोंच्या संख्येने जिवित हाणी होत आहेच. सोबतच वित्तीय हाणी सुध्दा मोठ्या प्रमाणात होत आहे.म्हणजेच मानवजातीसाठी सध्याचा काळ अत्यंत बिकट,गंभीर व धोकादायक स्थितीत येवून ठेपला आहे. आज पृथ्वीवर होत असलेल्या मानवी अतिक्रमणामुळे हिमकडा कोसळने,ज्वालामुखीचा उद्रेक, सुनामी, भूकंप ढगफुटी,अती पाऊस,अती उष्णता,अती थंडी आणि आता युध्दजन्य परिस्थितीमुळे निर्माण झालेला आगडोंब यामुळे सर्वत्र विनाशकारी परिस्थिती दिसून येत आहे. मानवाने स्वतःच्या स्वार्थासाठी जितक्या सुखसुविधा निर्माण केल्या आहेत त्याचे दुष्परिणाम हळूहळू वाढत असून विनाशाकडे वाटचाल करीत आहे. ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे. या संपूर्ण घटनाक्रमावरून लक्षात येईल की स्थल, वायू, जल, आकाश-पाताळ ही संपूर्ण ठिकाणे आज मानवामुळे विनाशाचे कारण बनत आहेत व



रमेश लांजेवार
नागपूर
मो.नं.९९२१६९०७७९,

# शंखी गोगलगायींचे व्यवस्थापन



**शंखी** गोगलगाय, शास्त्रीय नाव , हा प्राणी मोल्युस्का या प्रजातीतील असून गॅस्ट्रोपोडा वर्गात मोडतो. अलीकडच्या काळात महाराष्ट्रातील शेतांमध्ये या गोगलगायींचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर वाढलेला दिसून येतो. हे प्राणी आकाराने मोठे असून त्यांच्या कवचाची लांबी सुमारे १० ते १२ सेंमी असते. पावसाळी आणि दमट हवामानामुळे त्यांचे प्रजनन झपाट्याने होते. ही गोगलगाय उभयलिंगी असून एकाच वेळी अंडी घालू शकते. त्यामुळे त्यांच्या संख्येत काही आठवड्यांतच मोठी वाढ होते. शंखी गोगलगायी विविध भाजीपाला, फळझाडे, कोवळी रोपे यावर उपजीविका करतात. पानांवर छिद्र करून, कडे कुरतडून आणि शेंडे खाऊन त्या पिकांचे मोठे नुकसान करतात. गेल्या काही वर्षांतील बदलत्या हवामानामुळे गोगलगायींची प्रजोत्पत्ती वाढली आहे. लांबलेल्या पावसाच्या दिवसांमुळे त्यांच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या पिढ्याही सक्रिय होतात. प्रादुर्भाव असलेल्या भागात वेळेवर उपाय न केल्यास खरीप हंगामातील रोपे आणि भाजीपाला पिकांवर मोठा आर्थिक फटका बसतो. यावर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून उन्हाळ्यात खोल नांगरणी करणे, बांध स्वच्छ ठेवणे, गोगलगायी लपलेल्या जागी शोधून त्यांना नष्ट करणे आवश्यक आहे. शेताच्या कडेला राख, चुन्याचे पट्टे आखणे, बोर्डो पेस्ट झाडाच्या खोडाला लावणे, निंबोळी अर्क, तंबाखू अर्क व मोरचूद द्रावण फवारणे हे उपाय उपयुक्त ठरतात. संध्याकाळी किंवा सकाळी गोगलगायी गोळा करून मिठाच्या किंवा साबणाच्या पाण्यात बुडवून मारणे हा सोपा उपाय आहे. रासायनिक उपायांमध्ये मेटाल्डिहाइड किंवा आयर्न फॉस्फेट या गोगलगायनाशकांचा वापर काही प्रमाणात प्रभावी ठरतो. मेटाल्डिहाइडचा वापर करताना मात्र विशेष काळजी घेणे आवश्यक आहे, कारण ते पाळीव प्राण्यांसाठी घातक ठरू शकते. त्याऐवजी आयर्न फॉस्फेटचा वापर सुरक्षित मानला जातो. काही पारंपरिक आमिषांचे वापर जसे की गूळ, यीस्ट व थायामेथोक्झाम मिसळून तयार केलेले मिश्रण शेताच्या कडेने टाकल्यास गोगलगायी सहज आकर्षित होतात. हाताळताना हातमोजे व मास्क वापरणे आवश्यक आहे, कारण गोगलगायींमुळे या परोपजीवीमुळे मेंदूज्वर होण्याचा धोका असतो.गोगलगायींचा प्रसार शेतातील यंत्रसामग्री, अवजारे, जनावरे व वाहने यांद्वारे सहज होतो.

त्यामुळे सामूहिक प्रयत्नातून प्रतिबंधात्मक व नियंत्रणात्मक उपाय योजल्यास शंखी गोगलगायींचा प्रादुर्भाव प्रभावीपणे कमी करता येईल. शेतकरी व कृषी विभागाच्या संयुक्त कृतीने या समस्येवर नियंत्रण ठेवणे शक्य आहे.



- बालाजी देशमुख
सहाय्यक कृषी अधिकारी
कळंब.

# कौडगाव जिल्हा परिषद शाळेत प्रवेशोत्सव उत्साहात साजरा

आरंभ मराठी | धाराशिव

तालुक्यातील कौडगाव झेडपी शाळेत शाळेच्या पहिल्याच दिवशी प्रभातफेरी ' नवागत मुलांचे पुष्प ;खाऊ देवून स्वागत , मोफत पाठयपुस्तक ' गणवेश , बूट सॉक्स वाटप ' गोड भात देवून प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला . याप्रसंगी गावचे सरपंच दयानंदजी थोरात , उपसरपंच सावित्रा गुरव 'अध्यक्ष शेख अहेमद, सदस्य प्रदिप थोरात, ग्रामीण बीटचे विस्ताराधिकारी बापूसाहेब शिंदे, मुख्याध्यापक धोंगडे राजेश तसेच ग्रामस्थ उपस्थित होते . प्रास्ताविक ढेरे विष्णू ' सुत्रसंचलन माणिकशेट्टी राजकुमार यांनी तर कार्यक्रम यशस्वीतेसाठी घोंगडे रविंद्र, माळी जोत्सना मोटे सुरवसे, आटपळकर यांनी काम पाहिले.



हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव ) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.- 2023/90078

# महावितरण कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी ऑनलाइन मॉड्यूल

## लोकेश चंद्र यांच्या हस्ते उद्घाटन

आरंभ मराठी | मुंबई

वीज यंत्रणेत सुरक्षितपणे देखभाल व दुरूस्तीचे कामे करण्यासाठी तांत्रिक कर्मचाऱ्यांना महावितरणकडून २० ते २५ प्रकारचे वैयक्तिक व कॉमन सुरक्षा साधने देण्यात येतात. ही सुरक्षा साधने आवश्यकतेनुसार व मागणीप्रमाणे संबंधित कर्मचाऱ्यांना तात्काळ देण्यासाठी तयार केलेल्या स्वतंत्र 'टी ॲण्ड पी रजिस्टर मॉड्यूल'चे उद्घाटन अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्याहस्ते नाशिक येथे बुधवारी (दि.१८) झाले. वीज यंत्रणेत काम करताना कोणत्याही परिस्थितीत कर्मचाऱ्यांनी सुरक्षा साधनांचा वापर करावा व सुरक्षिततेची पूर्ण खात्री करूनच देखभाल व दुरूस्तीचे कामे करावीत असे आवाहन त्यांनी यावेळी केले. महावितरणच्या एम्प्लॉई पोर्टलवरील या स्वतंत्र मॉड्यूलमुळे सुरक्षेचे सर्व साधने व साहित्य तसेच चाचणी उपकरणांची उपलब्धता, वितरण, मागणी, पुरवठा व प्राप्तीची नोंद आदींचा लेखाजोगा ऑनलाइन उपलब्ध राहणार आहे. नाशिक विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमात अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक




श्री. लोकेश चंद्र यांच्याहस्ते हे मॉड्यूल कार्यान्वित करण्यात आले. यावेळी कोकण विभागाचे सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे, संचालक (संचालन/प्रकल्प) सचिन तालेवार, संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार, कार्यकारी संचालक प्रसाद रेशमे, मुख्य महाव्यवस्थापक (प्रशिक्षण व सुरक्षा) अरविंद भादिकर यांची उपस्थिती होती.महावितरणचे ग्रामीण, शहरी शाखा कार्यालये, वीज उपकेंद्र, चाचणी विभाग, भरारी पथक, फिल्टर युनिट आदी कार्यालयातील तांत्रिक कर्मचाऱ्यांना टेस्टर, स्क्रू ड्रायव्हर, रबर हातमोजे, गमबूट, रेनकोट, सेफ्टी बेल्ट, झुला, शूज आदी वैयक्तिक तसेच शिडी, एचटी व एलटीचे फोल्डेबल डिस्चार्ज रॉड, बॉक्स स्पॅनर, टॉर्च, मेगर, ड्रील मशीन आदी कॉमन सुरक्षा साधने आणि चाचणीसाठी काही उपकरणे देण्यात येतात. आतापर्यंत या साहित्यांची लेखी मागणी नोंदविणे, त्यास मंजूरी मिळणे, मंडल कार्यालयाकडून ते उपलब्ध होणे व वितरीत होणे ही पारंपरिक प्रक्रिया सुरू होती.

# शिवसेनेचा वर्धापन दिन उत्साहात साजरा



आरंभ मराठी | नारंगवाडी

शिवसेना पक्षाच्या ५९ व्या वर्धापन दिनानिमीत्त बुधवारी (दि.१९) उमरगा तालुका शिवसेनेच्या वतीने माजी आमदार तथा शिवसेना उपनेते ज्ञानराज चौगुले यांच्या जनसंपर्क कार्यालयामध्ये शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या पुतळ्यास जेष्ठ शिवसैनिक तथा शिवसेना उपतालुकाप्रमुख चंद्रशेखर सुर्यवंशी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून उपस्थित सर्वांच्या वतीने अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी युवती सेना निरीक्षक ॲड.आकांक्षा चौगुले, माजी नगरसेवक संतोष सगर, पंढरीनाथ कोणे, ज्येष्ठ शिवसैनिक मनोज जाधव, युवा सेना उपजिल्हाप्रमुख भगत माळी, तालुकाप्रमुख विनोद कोराळे, शहरप्रमुख अमर शिंदे, विद्यार्थी सेना ता.प्र. संदीप चौगुले, नाना मदनसुरे, शिवसेना वि.जा.भ.ज.सेल तालुकाप्रमुख गोपाळ घोडके, देवा चव्हाण, येळीचे सरपंच पतंग पवार, शहाजी येळीकर, शफी चौधरी, संजय माने, अरुण जगताप, दत्ता डोंगरे, डॉ.फरीद अत्तार, योगेश गायकवाड, प्रेम चव्हाण, सचिन आळंगे, चंद्रकांत मुळे, पृथ्वीराज हिरेमठ, अरुण गडदे, राज शिंदे आदी शिवसैनिक उपस्थित होते.

# ओएनजीसीच्या सीएसआर निधीतून अनुदानावर यंत्रसामग्री उपलब्ध;२३ जूनपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

आरंभ मराठी | धाराशिव

ओएनजीसीच्या (Oil and Natural Gas Corporation Ltd) सामाजिक उत्तरदायित्व (CSR) निधीतून जिल्ह्यातील शेतकऱ्यांना टोकन यंत्र (Dibbler) मानव चलित बीज प्रक्रिया ड्रम व मोटार चलित बीज प्रक्रिया ड्रम यासारख्या अत्याधुनिक घटकांवर ९० टक्केपर्यंत अनुदान देण्यात येणार आहे. अर्ज करण्याची अंतिम तारीख २३ जून २०२५ असून इच्छुकांनी विहित नमुन्यातील अर्ज तालुका कृषी अधिकारी कार्यालयात सादर करावेत असे आवाहन कृषी विभागाने केले आहे. लक्षांकापेक्षा जास्त अर्ज आल्यास 'लकी ड्रॉ' पद्धत वापरली जाईल. घटकांवर अनुदान देण्यापूर्वी GPS तपासणी केली जाईल व अनुदान थेट डीबीटीद्वारे खात्यावर जमा होईल.तालुका निहाय लाभार्थी लक्ष्य (प्रमुख घटकांसाठी) निश्चित केले आहे.अधिक माहितीसाठी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय,धाराशिव (०२४७२) २२७११८,२२७०६४ तसेच स्थानिक तालुका कृषी अधिकारी,मंडळ कृषी अधिकारी किंवा सहाय्यक कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

### अनुदान व पात्रता तपशील

१) टोकन यंत्र (Dibbler) पात्रता : वैयक्तिक शेतकरी, शेतकरी गट, एफपीओ, अनुदान किंमतीच्या ९० टक्के किंवा १ हजार रुपयेपर्यंत. अनुसूचित जाती-जमाती,महिला शेतकरी यांना प्राधान्य.

२) मानव चलित बीज प्रक्रिया ड्रम (Manual)अनुदान एकूण किंमतीच्या ९० टक्के किंवा ९ हजार रुपयांपर्यंत.इतर अटी व प्राधान्यक्रम वरीलप्रमाणे.मोटार चलित बीज प्रक्रिया ड्रम (Motor) अनुदान: किंमतीच्या ९० टक्के किंवा ३५ हजार ५५० रुपयांपर्यंत. प्राधान्य ऋजज शेतकरी गट वैयक्तिक शेतकरी.

# तुळजापूरच्या विद्यार्थ्यांचे राज्यस्तरीय अबॅकस स्पर्धेत यश

आरंभ मराठी | तुळजापूर

तुळजापूर येथील कृष्णा प्रो इन्स्टिट्यूट ( शाखा तुळजापूर) च्या विद्यार्थ्यांनी नुकत्याच पार पडलेल्या सोलापूर येथील आयोजित स्पर्धेत विद्यार्थ्यांनी त्यांच्या बुद्धिमत्तेचे व कौशल्याचे उत्तम प्रदर्शन करीत उल्लेखनीय यश संपादन केले. या भव्य स्पर्धेचे उद्घाटन सोलापूरचे पोलीस उपअधीक्षक विजयालक्ष्मी कुरि व पुजारी नगर फाउंडेशन चे अध्यक्ष गणेश पुजारी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. स्पर्धेत तुळजापूर शाखेच्या विद्यार्थ्यांनी विविध गटांमध्ये घवघवीत यश संपादन केले. पहिल्या गटात ऋषिकेश गंगणे तृतीय,त्याचप्रमाणे फाउंडेशन सिनियर लेवल मध्ये क्षितिजा मस्के द्वितीय,अंकिता पाठक द्वितीय रनर अप तर फाउंडेशन जूनियर मध्ये पहिल्या गटातून जान्हवी जोशी द्वितीय ,दुसऱ्या गटात आरोही पाठक द्वितीय,हर्षद पाठक द्वितीय रनर अप तर,नारायणी प्रयाग व वैष्णवी

# शिवानंद शिवाचार्य महास्वामीजी यांचा श्री संत गाडगेबाबा सेवाभावी संस्थेच्या वतीने गौरव



आरंभ मराठी | जळकोट

श्री सिद्धेश्वर कट्टीमठ संस्थांचे परमपूज्य मठाधिपती श्री.श्री.श्री. ष.ब्र. १०८ शिवानंद शिवाचार्य महास्वामीजी यांना त्यांच्या अध्यात्मिक, धार्मिक व सामाजिक सेवेच्या योगदानाबद्दल धर्मबद्ध शिरोमणी महाराज हा अत्यंत मानाचा पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला. या गौरवप्राप्त प्रसंगी, श्री संत गाडगेबाबा सेवाभावी संस्था, जळकोट यांच्या वतीने खास सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. स्वामीजींच्या सेवाकार्यास कृतज्ञता व्यक्त करत संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या पवित्र चरणी पुष्पहार अर्पण केला व शाल, श्रीफळ देऊन औपचारिक सत्कार करण्यात आला. या समारंभात रवी मडोळे, आनंद परीट, लक्ष्मण मडोळे, संतोष मडोळे, माणिक मडोळे, परमेश्वर मडोळे, कृष्णनाथ परीट, सदाशिव मडोळे, पत्रकार मेघराज किलजे यांची उपस्थिती होती.

# डी.बी.ए समूहाच्या वतीने राजमाता जिजाऊ मांसाहेब यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

आरंभ मराठी | परंडा

परांडा येथील शासकीय विश्राम गृह येथे डी.बी.ए समूहाच्या वतीने राजमाता जिजाऊ माँ साहेब यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी डी.बी.ए समूह संस्थापक /अध्यक्ष दयानंद बनसोडे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार सामाजिक न्याय विभागाचे जिल्हा अध्यक्ष राहुल बनसोडे, अपंग संघटनेचे जिल्हाध्यक्ष उत्तम शिंदे, महात्मा फुले समता परिषद जिल्हाध्यक्ष बिभीषण खुणे, प्रहारचे जिल्हा संपर्क प्रमुख नागनाथ नरोटे, चर्मकार संघटनेचे तालुकाध्यक्ष कानिफनाथ सरपने,एडवोकेट दयानंद धेंडे ,यांनी सामुदायिक राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे दीप धूप प्रज्वलन करून पूजा केली. यावेळी राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ यांच्या जीवनावर राहुल बनसोडे, दयानंद बनसोडे, एडवोकेट दयानंद घेंडे, नागनाथ नरोटे, कानिफनाथ सरपने, दत्तात्रय पाटील यांनी विचार मांडले. यावेळी



सामाजिक न्याय विभागाचे जिल्हा सरचिटणीस घनश्याम शिंदे, भारत भोसले, धर्मराज नरोटे, संतराम पाटील, अविनाश ओव्हाळ, छगन चौधरी, जेजेराम कांबळे, विकास सोनवणे ,समाधान सूर्यवंशी, उत्तम गायकवाड, इत्यादी नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते. शेवटी आभार प्रदर्शन दयानंद बनसोडे यांनी मांडले.

# मोर्डा येथील शालेय व्यवस्थापन समितीचे नूतन अध्यक्ष प्रविण सातपुते व उपाध्यक्ष बालाजी कोळेकर यांचा सत्कार

आरंभ मराठी | तुळजापूर

तुळजापूर तालुक्यातील मोर्डा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी प्रविण देविदास सातपुते यांची तर उपाध्यक्षपदी बालाजी गंगादास कोळेकर यांची चिठ्ठीद्वारे सर्वानुमते निवड करण्यात आली. ही निवड प्रक्रिया बुधवारी (दि.१८) पार पडली. विस्तार अधिकारी विस्तार अधिकारी मल्लिनाथ काळे यांच्या अध्यक्षतेखाली व मुख्याध्यापक बाळासाहेब वाघमारे यांच्या उपस्थितीत शैक्षणिक वर्ष २०२५ ते २०२७ सालासाठी झालेल्या पालक सभेच्या मेळाव्यात बुधवारी ही निवड प्रक्रिया खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. या निवड प्रक्रियेत अध्यक्ष व उपाध्यक्ष पदासाठी चार जण इच्छुक होते. चार चिठ्ठ्या टाकून प्रशालेतील विद्यार्थ्यांकडून चिठ्ठी काढून



अध्यक्ष उपाध्यक्ष पदाची निवड करण्यात आली. यावेळी सभेत विविध समित्या गठित करण्यात आल्या.यावेळी २०२५ ते २०२७ या दोन वर्षांच्या कार्यकाळासाठी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी सातपुते यांची तर उपाध्यक्षपदी कोळेकर यांची निवड करण्यात आली. निवडीनंतर बुधवारी सायंकाळी मोर्डा गावचे माजी सरपंच राजाभाऊ शेंडगे यांच्या तुळजापूर येथील निवासस्थानी नुतन अध्यक्ष सातपुते व उपाध्यक्ष कोळेकर यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. यावेळी नूतन अध्यक्ष प्रविण सातपुते यांनी सर्वांच्या सहकार्याने शाळेच्या विकासासाठी आदर्शवत काम करण्याचे आश्वासन दिले. यावेळी मुरलीधर पाटील, सुरेश कोळेकर, हरिश्चंद्र कोळेकर, प्रथमेश सुरवसे, राजाभाऊ शेंडगे, आकाश सुरवसे, महेश कोळेकर, राहुल जाधव, शुभम शेंडगे आदी मान्यवर उपस्थित होते.

# भ्रष्ट्राचार निर्मुलन समितीचे आज आत्मदहन आंदोलन

आरंभ मराठी | तुळजापूर

तुळजापूर तालुक्यातील बोगस डॉक्टरांवर अनेक वेळा आंदोलन करूनही जाणीवपूर्वक प्रशासनाकडून कारवाई होत नसल्यामुळे तसेच बोगस डॉक्टरांना आरोग्य प्रशासन पाठीशी घालत असल्यामुळे अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती यांच्या वतीने आज (दि.२०) तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय तुळजापूर येथे जिल्हाध्यक्ष गणेश पाटील हे आत्मदहन करणार आहेत. याबाबत अधिक माहिती अशी की, गेल्या अनेक वर्षापासून बोगस डॉक्टर विरोधात अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती ही आंदोलन करत असून पदवी नसताना बोगस मुन्नाभाई अनेक उपचारावर औषध उपचार करून तालुक्यातील जनतेची फसवणूक करत आहेत. त्याचबरोबर आरोग्य प्रशासनाकडून बेकायदेशीर चालणाऱ्या तालुक्यातील बोगस डॉक्टरांवर तत्काळ कारवाई करू अशा प्रकारचे लेखी पत्र देऊनही अद्यापही कारवाई होत नाही. तुळजापूर तालुक्यातील मंगरूळ येथील एका डॉक्टरवर अत्याचाराचा गुन्हा दाखल होऊनही पुन्हा त्याचे क्लिनिक सुरु आहे. यासंदर्भात तालुका आरोग्य अधिकारी व जिल्हा अधिकारी यांना निवेदन देऊन शुक्रवारी (दि.२०) आत्मदहन करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे. या निवेदनावर जिल्हाध्यक्ष गणेश पाटील यांची स्वाक्षरी आहे.

# शिवसेना वर्धापन दिन विविध उपक्रमांनी साजरा



आरंभ मराठी | धाराशिव

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचा ५९ वा वर्धापन दिन विविध सामाजिक उपक्रमाने साजरा करण्यात आला. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण या धोरणानुसार शिवसेनेची वाटचाल सामाजिक बांधिलकी जोपासत आजही मोठ्या जोमाने सुरू आहे. त्याचाच एक भाग म्हणून शिवसेनेचे खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, आमदार कैलास पाटील, पक्षाचे सहसंपर्कप्रमुख मकरंद राजेनिंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाच्या वर्धापन दिनानिमित्त धाराशिव शहरातील तांबरी विभाग येथील नगर परिषद शाळा क्र. २१ येथे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य आणि खाऊ वाटप करण्यात आले. यावेळी माजी नगराध्यक्ष प्रदीप साळुंके, शिवसेनेचे जिल्हा सचिव प्रवीण कोकाटे, शहरप्रमुख सोमनाथ गुरव, युवा सेनेचे जिल्हाप्रमुख रवि वाघमारे, मा. नगरसेवक बाळासाहेब काकडे, राणा बनसोडे, सिद्धेश्वर कोळी, पंकज पाटील,युवासेना तालुकाप्रमुख राकेश सुर्यवंशी, शहरप्रमुख अभिराज कदम, शौकत कुरेशी, सुमित बागल, मनोज पडवळ, अमित उंबरे, मनोज उंबरे, प्रताप शेंडगे, वाहतूक सेनेचे सुनील वाघ, पिंटू आंबेकर, संकेत सुर्यवंशी, शहाजी पवार, अंकुश चौगुले, पांडू भोसले, महेश लिमये, प्रसाद राजेनिंबाळकर, प्रवीण केसकर, संजय भोरे, राज निकम, प्रदीप साळुंके, अक्षय खळदकर, अबरार कुरेशी, मिलिंद पेठे, सतीश लोंढे, पंकज पडवळ यांच्यासह शिवसेना, युवासेना आणि रणसम्राट प्रतिष्ठानचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कृषिदूतांची शासकीय पशुसंवर्धन विभागासोबत लसीकरण मोहीम

आरंभ मराठी | धाराशिव

पावसाळ्याच्या कालावधीत गाय व म्हैसवर्गीय पशुधनात घटसर्प, फऱ्या रोगांचा प्रादुर्भाव वाढण्याची अधिक भीती असते. वेळीच उपचार न झाल्यास पशुधन दगावले जाऊ शकते. त्यामुळे हे आजार रोखण्यासाठी कृषि महाविद्यालय आळणी येथील कृषिदूतांनी पशुसंवर्धन विभाग तेर यांच्यासोबत लसीकरण मोहीम सुरू केली आहे. बहुतांश शेतकरी शेतीस जोडधंदा म्हणून दुग्ध व्यवसाय करीत आहेत. घटसर्प, फऱ्या, इव्हीटी, लम्पी स्कीन आजाराची लागण जनावरांना होऊ नयेत, यासाठी प्रतिबंधक उपाय म्हणून हे लसीकरण केले जाते. खरिपाचा हंगाम सुरु होण्यास अजून अवधी असला तरीही पावसाळ्याच्या दिवसांत जनावरांमध्ये रोगप्रतिकारशक्ती वाढावी. तसेच पशू आजार उद्भवल्यास त्यावर मात करता यावी, म्हणून पशुसंवर्धन विभागाच्या वतीने मान्सूनपूर्व लसीकरण मोहीम हाती घेण्यात येते. या मोहिमेअंतर्गत तीन महिन्यांपेक्षा जास्त वयोगटातील गाई, म्हशीच्या वासरांनादेखील लसीकरण करण्यात येते. तेरमध्ये मुख्यता घटसर्प या रोगावरील लसीकरण करण्यात आले. या मोहिमेत शासकीय पशुवैद्यक बी. एफ. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली व्यवस्थापक हरि घाडगे, देवानंद शेटे पशू वैद्यशास्त्र मार्गदर्शक रोहित इंगळे, सतीश दळवी तसेच कृषिदूत प्रणय कोकाटे, जगदिश बसाटे, रमण घोरपडे,




अशोक यादव, अमोल मायकर, साहिल सांगुळे, संकेत सांगुळे यांचा समावेश होता. सर्व पशुपालकांनी आपल्या पशुंचे लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन कृषिदुतांच्या व पशुसंवर्धन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. तसेच यापुढे गावोगावी लसीकरण मोहीम राबविण्यात येणार असल्याने सोय होणार आहे. जनावरांना धाप लागणे, चारा कमी खाणे, अशा प्रकारची लक्षणे जाणवल्यास पशुसंवर्धन दवाखान्यात जाऊन जनावरांना लस टोचून घेण्याचे आवाहन पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडून करण्यात आले आहे.

# जमीन आरोग्य पत्रिकांच्या आधारे खतांचा वापर करा; उमरगा कृषी विभागाचे आवाहन

आरंभ मराठी | उमरगा

उमरगा तालुक्यात राष्ट्रीय अन्नसुरक्षा आणि पोषण अभियान अंतर्गत प्रात्यक्षिक घटकांमध्ये ऑनलाईन पद्धतीने निवड झालेल्या शेतकरी गटांना बियाणे वाटप करण्यात येत आहे. उमरगा तालुक्यातील मौजे भगतवाडी, कोळेवाडी, चिरेवाडी येथे कृषी विभागाच्या वतीने खरीप हंगाम बैठक आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमांमध्ये जमीन आरोग्य पत्रिका नुसार खत व्यवस्थापन तसेच खरीप मोहीम बी बियाणे वाटप गटामार्फत करण्यात आले. खरीप हंगामातील महत्त्वाची पिकांचे व्यवस्थापन, बियाणे निवड, बीज प्रक्रिया, बियाणे उगवण क्षमता चाचणी याबद्दल सविस्तर असे मार्गदर्शन प्रात्यक्षिकाद्वारे सहाय्यक कृषी अधिकारी सचिन पवार यांनी केले. या गाव स्तरीय बैठकीस सहाय्यक कृषी अधिकारी सचिन पवार, युवा प्रशिक्षणार्थी अमित पवार, विमा प्रतिनिधी अभिमन्यू करनुरे तसेच गावातील महिला शेतकरी व प्रगतशील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक आरंभ मराठी

www.arambhmarathi.com

आपलं धाराशिव. शुक्रवार दि.20 जून 2025

# मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या बँका व अधिकाऱ्यांचा गौरव

आरंभ मराठी | धाराशिव

राज्य शासनाची महत्वाकांक्षी योजना असलेल्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत उद्योग व्यवसायासाठी सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यात येते. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सन २०२४-२५ मध्ये उद्दिष्टपूर्ती केलेल्या बँक शाखा तसेच सलग तीन वर्षे उत्कृष्ट कार्य करणाऱ्या जिल्हा उद्योग केंद्रातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान समारंभ जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात १८ जून रोजी पार पडला. या कार्यक्रमात जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन उपस्थित बँक व कार्यालयीन प्रतिनिधींचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमास भारतीय रिझर्व्ह बँकेचे प्रादेशिक अधिकारी,नाबार्डचे जिल्हा व्यवस्थापक, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक,विविध बँकांचे क्षेत्रीय व्यवस्थापक,उद्दिष्टपूर्ती केलेल्या शाखांचे व्यवस्थापक तसेच जिल्हा पातळीवरील विविध यंत्रणांचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्री.पुजार यांनी आपल्या भाषणात सांगितले की, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम या योजनेद्वारे जिल्ह्यातील तरुणांना व्यवसायासाठी आवश्यक भांडवलाची मदत होत असून,बँका व शासकीय यंत्रणांच्या समन्वयातून हे उद्दिष्ट साध्य होत आहे.त्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना पुढील काळातही योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आवाहन केले. बँक अधिकारी व शाखा व्यवस्थापक यांना यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. यामध्ये जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक चिन्मय दास, एस.बी.आय क्षेत्रीय व्यवस्थापक नरसिंगकुमार मेहता, एम.जि.बी क्षेत्रीय व्यवस्थापक अविनाश कामतकर, बी.ओ.एम क्षेत्रीय व्यवस्थापक संजीवकुमार,बँक ऑफ इंडिया क्षेत्रीय व्यवस्थापक चंद्रशेखर मंत्री, एस.बी.आय,जिल्हा कोर्ट शाखा शाखा व्यवस्थापक सचिन कुलकर्णी,एस.बी. आय, तुळजापूर (नळदुर्ग रोड) शाखा व्यवस्थापक दुर्गेश कुलकर्णी, एम.जि.बी,सलगरा शाखा, व्यवस्थापक सोमनाथ चव्हाण, एम.जि.बी,गुंजोटी शाखा व्यवस्थापक राजेश नेणावथ, एम.जि.बी,कळंब शाखा व्यवस्थापक दीपक रामगुडे, एम.जि.बी,शिराढोण शाखा व्यवस्थापक अनिरुद्ध पाटील, एम.जि.बी,शेलगाव शाखा व्यवस्थापक तुषार माने,एम.जि.बी, मोहा शाखा व्यवस्थापक भूषण कांबळे,एम.जि.बी,काटी शाखा व्यवस्थापक कुणाल काटकर, बी.ओ.एम,पारगाव शाखा व्यवस्थापक अर्जुन गायकवाड, बी.ओ.एम,मुरूम शाखा व्यवस्थापक अरविंद नाईक,बी.ओ.एम,कळंब शाखा व्यवस्थापक मानवेंद्र पटेल, बी.ओ.एम,कसबे तडवळे शाखा व्यवस्थापक सौरभ धारवाल, बी.ओ.एम,तामलवाडी शाखा व्यवस्थापक कृष्णा बोजा,बँक ऑफ इंडिया,धाराशिव शाखा व्यवस्थापक आनंदकुमार वासनिक बँक ऑफ इंडिया,भूम शाखा व्यवस्थापक राहुल गाडे बी.ओ.बी, धाराशिव शाखा व्यवस्थापक अजयकुमार,जिल्हा उद्योग केंद्र व्यवस्थापक कमलाकर तांदळे व माधव सूर्यवंशी,खादी ग्रामोद्योग मंडळ जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी महादेवी रणदिवे,उद्योग निरीक्षक अक्षय घोडके,उद्योग निरीक्षक अभिजीत लांडे यांना सन्मानित करण्यात आले.




# मांडव्याच्या जिल्हा परिषद शाळेला संगणक; शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना आनंददायी भेट




आरंभ मराठी | वाशी

तालुक्यातील मांडवा येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेला माजी विद्यार्थ्यांनी संगणक भेट देऊन शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित केला. या संगणकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना संगणकाचे ज्ञान मिळणार असून,त्यामुळे शाळेच्या वतीने माजी विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात आले.

साधारण १९८५ च्या दरम्यान कोणत्याही सुविधा नसलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळेत पहिले अक्षर गिरवलेल्या तत्कालीन विद्यार्थ्यांनी सामाजिक जाणिवेतून शाळेला संगणक भेट देण्याचा निर्णय घेतला. यासाठी वर्गमित्रांनी वर्गणी जमा करून शाळेसाठी ब्रँडेड कंपनीचा संगणक भेट दिला. नवीन शैक्षणिक सत्राच्या पहिल्या दिवशी काही निवडक माजी मित्रांच्या हस्ते शाळेला संगणक भेट देऊन विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित करण्यात आला. मांडवा गावचे भूमिपुत्र,दैनिक आरंभ मराठीचे मुख्य संपादक चंद्रसेन देशमुख, शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर मल्टीस्टेटचे वाशीचे शाखाधिकारी तानाजी देशमुख,छत्रपती संभाजी नगर येथे स्थायिक झालेले गावचे सुपुत्र सचिन लिंबराज जाधव,शिक्षक सुरेश रणदिवे,शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य मसियोद्दीन काझी,व्यावसायिक संतोष राशनकर आदींच्या मदतीने शाळेस कंपनीचा अत्याधुनिक संगणक भेट देण्यात आला.यावेळी शाळेच्या वतीने प्रातिनिधिक स्वरूपात तानाजी देशमुख यांचा मुख्याध्यापकांनी सन्मान केला.याप्रसंगी शा.व्य.स.अध्यक्ष समाधान रणदिवे,बापुराव पाटील, नितीन बारगजे,जयराज परीहार,अजय साबळे, अमोल माळी,कान्तु तावरे,मुकेश देशमुख यांच्यासह शिक्षणप्रेमी उपस्थित होते.शाळेच्या प्रगतीबद्दल शिक्षकांचे कौतुक करून समाधान व्यक्त केले.

# प्रवेशोत्सवानिमित्त शिक्षक आमदार विक्रम काळे यांच्या विविध शाळांना भेटी

आरंभ मराठी | कळंब

सध्या राज्य सरकारने शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थी उपस्थित ठेवून त्यांना मोफत गणवेश व पाठ्यपुस्तक दिल्यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास द्विगुणित होत आहे आणि त्याला शाळेची ओढ निर्माण होऊन आपुलकी तयार होते असे प्रतिपादन छत्रपती संभाजीनगर विभागाचे शिक्षक आमदार विक्रम काळे यांनी केले. ते कळंब तालुक्यातील सौंदणा अंबा येथील संत गोरोबा काका विद्यालयातील शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रमात बोलत होते. यावेळी माध्यमिक उपशिक्षणाधिकारी दत्तात्रय लांडगे, माजी कुलगुरू मधुकर गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कळंब तालुकाध्यक्ष प्रा.शिवाजी लकडे, धाराशिव तालुकाध्यक्ष प्रशांत फंड, तुळजापूर तालुकाध्यक्ष श्रीकांत सुर्यवंशी, लातूर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा कार्याध्यक्ष अंकुश नाडे, भाजपचे कळंब तालुकाध्यक्ष दत्तात्रय साळुंके, नंदू समुद्रे, मुख्याध्यापक परमेश्वर पालकर, मुख्याध्यापिका श्रीमती सुनीता नरवडे उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका सुनिता नरवडे यांनी केले तर सुत्रसंचालन भाऊसाहेब आवाड यांनी केले, आभार जाधव सुरेश यांनी केले.



## तालुक्यात या शाळांना दिल्या भेटी

शिक्षक आमदार विक्रम काळे यांनी तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सौंदाना आंबा, रांजणी, नायगाव, घारगाव, लोकनायक माध्यमिक विद्यालय नायगाव, कृषी विद्यालय नायगाव, संत गोरोबा काका विद्यालय सौदणा अंबा, हनुमान माध्यमिक विद्यालय घारगाव, हजरत खाजा बदरोदीन विद्यालय रांजणी या शाळांना भेटी देऊन शुभेच्छा दिल्या.

# जवळा शिवारात खरीप पेरणीला वेग



आरंभ मराठी | जवळा

परंडा तालुक्यातील जवळा परिसरात मे महिन्यात पाऊस झाल्यामुळे शेतकऱ्याची उन्हाळी कामे अर्धवट झाल्याने शेतकरी चिंतातुर् होते. परंतु ट्रॅक्टर यंत्राद्वारे राहिलेली कामे मृग नक्षत्र येईपर्यंत शेतकऱ्यांनी आटोपून घेतली. ट्रॅक्टर यंत्राद्वारे जलद कामे झाल्यामुळे व तसेच समाधानकारक पाऊस झाल्यामुळे जवळा परिसरातील शेतकऱ्यांनी पेरणी करण्याकडे लगबग केली. यंदा मृग नक्षत्रातच जवळा परिसरातील शेतकऱ्यांनी सोयाबीन ,उडीद,तूर, मूग,कांदा पेरणी केलेली दिसून येत आहे. जवळा परिसरातील शेतकऱ्यांनी बैल जोडीसह ट्रॅक्टर यंत्राद्वारे मका, सोयाबीन, तूर, उडीद, मूग या पिकांची पेरणी केली. यावेळी जवळा परिसरात सहाय्यक कृषी अधिकारी संदीप यादव यांनी बीबीएफ पद्धतीने पेरणी करण्याचे शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

# शालेय अभ्यासक्रमात हिंदी भाषेच्या सक्ती विरोधात शिवराज्याभिषेक सोहळा समितीचे प्रशासनाला निवेदन

आरंभ मराठी | धाराशिव

शालेय अभ्यासक्रमात हिंदी भाषेच्या सक्ती विरोधात शिवराज्याभिषेक सोहळा समितीने निवेदन देऊन विरोध दर्शविला. दिनांक १ मे १९६० रोजी महाराष्ट्रासह भारतातील बहुसंख्य राज्यांची निर्मिती ही भाषिक तत्त्वावर करण्यात आलेली होती. त्यामध्ये महाराष्ट्राची रचना ही मराठी भाषेच्या भाषिक तत्त्वावर झालेली आहे. संपूर्ण मुंबई, कोकण, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा या सह संपूर्ण महाराष्ट्र मराठी भाषेत बोलणारा प्रदेश असल्यामुळे महाराष्ट्राची राजभाषा ही मराठी करण्यात आलेली आहे. त्यामुळे महाराष्ट्रावर केवळ मराठी भाषेचा अधिकार आहे. शासनाच्या नवीन अध्यादेशामुळे महाराष्ट्रातील शालेय शिक्षणामध्ये भाषा विषय म्हणून हिंदी भाषेचा अनिवार्य विषय करण्यात आलेला आहे. हिंदी भाषा महाराष्ट्रावर लादण्याचा हा प्रकार आहे. संपूर्ण देशभरातील राज्यांची निर्मिती ही भाषीय तत्त्वावर झालेली असताना स्वतंत्र भारतामध्ये कोणत्याही राज्यांमध्ये भाषेची सक्ती करण्यात येणार नाही असे राज्यघटनेत नमूद करण्यात आलेले आहे. तरी शालेय अभ्यासक्रमात हिंदी भाषेची करण्यात आलेली सक्ती तातडीने मागे घेण्यात यावी अन्यथा संपूर्ण महाराष्ट्रातील मराठी जनता व शिवराज्याभिषेक सोहळा समिती धाराशिवच्या वतीने मोठे जन आंदोलन उभारण्यात येईल याची शासनाने प्रशासनाने गांभीर्याने दखल घ्यावी असा इशारा शिवराज्याभिषेक सोहळा समिती धाराशिव जिल्हा, शिवराज्याभिषेक सोहळा समिती धाराशिव शहर, शिवराज्याभिषेक सोहळा समिती धाराशिव तालुका, शिवराज्याभिषेक रिक्षा समिती धाराशिव यांच्या वतीने राज्यपाल, मुख्यमंत्री व जिल्हाधिकारी यांना दिले आहे. यावेळी शिवराज्याभिषेक सोहळा समिती धाराशिवचे धर्मराज सूर्यवंशी, अमोल पवार, हनुमंत यादव, आकाश भोसले, संतोष घोरपडे, हनुमंत तांबे, बबलू भोईटे, व्यंकटेश पडिले, ज्ञानेश्वर नलावडे, अमोल साळुंके, भैरवनाथ रणखांब, दत्तात्रय साळुंके, नितीन वीर, योगेश अतकरे, प्रशांत नांदे, बालाजी पवार, सचिन खापरे, अक्षय घाडगे, ज्योतीराम काळे, अमोल गोरे, तुषाल सूर्यवंशी, विश्वंभर आगळे, संजय शिंदे, बालाजी खोचरे, ज्ञानेश्वर मते, अडव्हेकेट अविनाश गरड, ॲडव्होकेट ओंकार शितोळे यांच्यासह समितीचे बहुसंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.




# प्रशिक्षण घेतलेल्या शिक्षकांना अर्जित रजा मंजूर कराव्यात

## शिक्षक परिषदेची शिक्षण आयुक्तांकडे मागणी


आरंभ मराठी | धाराशिव

वरिष्ठ वेतनश्रेणी व निवड वेतनश्रेणी प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षक तसेच अध्यापक विद्यालयातील शिक्षक व प्रशिक्षणाचे सुलभक यांना दहा दिवसांची विशेष अर्जित रजा मंजूर करण्यात यावी,अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या जिल्हा शाखेच्या वतीने राज्य शिक्षण आयुक्त यांच्याकडे करण्यात आली आहे.यासंदर्भात गुरुवारी संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की , महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांच्यामार्फत नुकतेच वरिष्ठ व निवड वेतन श्रेणी साठी पात्र शिक्षकांसाठी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. २६ ते २९ जून या कालावधीत सुलभक यांनी प्रशिक्षण पूर्ण केले. तसेच २ जून ते १२ जून या कालावधीत पात्र शिक्षकांनी संबंधित प्रशिक्षण घेतले. सदरचे प्रशिक्षण दीर्घ सुट्टीच्या कालावधीत आयोजित करण्यात आल्यामुळे महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी सेवा शर्ती नियमावली १९८१ मधील नियम क्रमांक १६ (१८ ) अ तरतुदीनुसार प्रशिक्षण पूर्ण केलेल्या शिक्षकांना विशेष अर्जित रजा अनुज्ञेय आहे. संबंधित प्रशिक्षण पूर्ण केलेल्या सुलभक व शिक्षकांना दहा दिवसांची अर्जित रजा मंजूर करण्यात यावी. तसेच अर्जित रजांची नोंद शिक्षक कर्मचाऱ्यांच्या सेवा पुस्तिकेत घेण्याबाबत सर्व शिक्षणाधिकारी यांना आदेशित करण्यात यावे , अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने निवेदनाद्वारे राज्य कार्याध्यक्ष उमाकांत कुलकर्णी, जिल्हाध्यक्ष रमेश गटकळ, निवृत्ती मुळे, सुनिल काळे, बाबासाहेब जगताप, दयानंद चव्हाण आदींच्या स्वाक्षरी आहेत.

# महाआरती करून शिवसेनेचा वर्धापन दिन साजरा

आरंभ मराठी | तुळजापूर

हिंदुहृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांनी १९ जून १९६६ रोजी मराठी माणसाच्या न्याय-हक्कासाठी शिवसेनेची स्थापना केली होती. त्याच शिवसेनेला दि.१९ जून रोजी ५९ वर्ष पूर्ण झाली. राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक आणि शिवसेनेचे उपनेते ज्ञानराज चौगुले व शिवसेनेचे जिल्हाप्रमुख मोहन पनुरे यांच्या मार्गदर्शनाखाली श्री तुळजाभवानी मंदिरात देवीला विधिवत पूजा करून महाआरती करत शहाजी महाद्वारासमोर शिवेसेनेचा वर्धापनदिन साजरा करण्यात आला. यावेळी शिवसेनेचे तालुकाप्रमुख अमोल जाधव ,शहर प्रमुख बापूसाहेब भोसले, उपशहर प्रमुख रमेश चिवचिवे, शेतकरी सेनाप्रमुख गणेश नेपते, संजय लोंढे ,विक्रम कदम ,दुर्गेश कदम, रवी पाठक, मोहन भोसले ,संभाजी नेपते, मयूर कदम ,गौरव साळुंखे यांच्यासह असंख्य शिवसैनिक उपस्थित होते.



# जाकेपिंपरी येथे विजेचा शॉक लागून तरुणाचा मृत्यू

आरंभ मराठी | परंडा

परंडा तालूक्यातील जाके पिंपरी येथे गुरुवारी (दि.१९) सकाळी साडे नऊ वाजेच्या सुमारास मोठी दुर्घटना घडली असुन लाईन बदलताना विजेचा शॉक लागून भैरवनाथ लांडगे (वय २५) या तरुणाचा जागीच मुत्यू झाला.या घटनेन हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. लांडगे याचा मुत्यु परंडा वीज वितरण कार्यालयाच्या हलगर्जीपणा मुळे झाला असल्याचा आरोप करत परिसरात संताप व्यक्त करण्यात येत आहे. घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. वीज कार्यालयातील कर्मचाऱ्याच्या सुचनेनुसार भैरवनाथ लांडगे हा तरुण गावातील विजेची छोटी छोटी कामे करीत होता. पोलवरील स्वीच बंद करताना विजेचा शॉक लागून एकुलता एक मुलगा अचानक गेल्याने लांडगे कुटूंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असुन, गावावर शोककळा पसरली आहे.

# जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांची जैविक शेती संसाधन केंद्र व प्रयोगशाळांना भेट

## जिल्हाधिकारी आणि सीईओ यांनी घेतला पेरणीचा अनुभव





आरंभ मराठी | धाराशिव

डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत धाराशिव जिल्ह्यात जैविक शेतीस प्रोत्साहन देण्यासाठी आज महत्त्वपूर्ण पाहणी दौरा झाला.जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष यांनी मौजे वरुडा (ता.धाराशिव) येथील धाराशिव शिवार सारथी शेतकरी उत्पादक कंपनीच्या जैविक निविष्ठा संसाधन केंद्र व शेतबांधावरील प्रयोगशाळेची प्रत्यक्ष पाहणी केली. या दौऱ्यात मौजे ढोकी (ता. धाराशिव) येथे रामभाऊ केरबा पवार यांच्या शेतावर बीजप्रक्रियेचे प्रात्यक्षिक करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी डॉ.मैनाक घोष यांनी स्वतः ट्रॅक्टर चालवत बीबीएफ पद्धतीने सोयाबीन पेरणी केली आणि टोकन यंत्राद्वारे लागवडीचे प्रात्यक्षिक दाखवले. त्यानंतर शंखी गोगलगायी नियंत्रण प्रात्यक्षिक देखील राबविण्यात आले. दौऱ्याचा पुढील टप्पा मौजे तडवळा येथे पार पडला, जिथे बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पांतर्गत पीकलँड शेतकरी उत्पादक कंपनीला भेट देण्यात आली. यावेळी बीजोत्पादन व क्लिनिंग-ग्रेडिंग युनिटची पाहणी करण्यात आली. या निरीक्षण दौऱ्यावेळी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी रविंद्र माने, उपविभागीय कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी तसेच स्थानिक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आंदोलनाची धास्ती,राष्ट्रवादीच्या उपोषणाच्या इशाऱ्यानंतर लिगाडे वस्तीला १५ वर्षांनी नळाने पाणी

आरंभ मराठी | मुरुम

शहरातील लिगाडे प्लॉट वस्तीतील १५ वर्षांपासून बंद असलेला नळाद्वारे पाणीपुरवठा राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या पाठपुराव्यामुळे अखेर सुरू झाला आहे. नागरिकांच्या दीर्घकालीन मागण्यांकडे दुर्लक्ष करणाऱ्या नगरपालिकेला राष्ट्रवादीच्या आमरण उपोषणाच्या इशाऱ्यामुळे हालचाल करावी लागली आणि १७ जूनच्या अगोदरच युद्धपातळीवर काम करत वस्तीतील नळांना पाणीपुरवठा सुरू करण्यात आला.या भागात पाईपलाईन असूनही ती मुख्य जलवाहिनीस जोडण्यात न आल्यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून पाणीटंचाई जाणवत होती. स्थानिक नागरिकांनी वेळोवेळी तक्रारी करूनही प्रशासनाकडून याकडे दुर्लक्षच करण्यात आले होते. अखेर राष्ट्रवादी युवक काँग्रेसने या प्रश्नाची गंभीर दखल घेत ३० मे व १० जून रोजी मुख्याधिकारी सचिन भुजबळ यांना निवेदन देऊन तीन प्रमुख मागण्या मांडल्या होत्या.त्यात प्रामुख्याने नळांना नियमित पाणीपुरवठा सुरू करणे, न वापरलेल्या नळांवरील जबरदस्तीची नळपट्टी रद्द करणे, घरकुल योजनेतील नळपट्टीची अट शिथिल करणे. या मागण्या न मानल्यास १८ जूनपासून आमरण उपोषण छेडण्याचा इशाराही राष्ट्रवादीकडून देण्यात आला होता. उपोषणाची तीव्रता लक्षात घेऊन नगरपालिकेने तातडीने हालचाली करत १७ जूनपूर्वीच नळजोडणी पूर्ण केली आणि पाणीपुरवठा सुरू केला. यासोबतच घरकुल योजनेसाठी नळपट्टीची अट शिथिल केल्याचे प्रशासनाने लेखी स्वरूपात कळवले असून, पूर्वी लावलेली नळपट्टी रद्द करण्यासाठी शासनस्तरावर प्रस्ताव पाठवण्यात येणार असल्याचेही सांगण्यात आले.या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी युवक काँग्रेसने आपले उपोषण स्थगित करत अनेक वर्षांचा सामान्य नागरिकांचा संघर्ष संपल्याचा विजयी आनंद व्यक्त केला. वस्तीतील नागरिकांनी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे आभार मानत त्यांच्या पुढाकारामुळे दीर्घकालीन पाणी प्रश्न मार्गी लागल्याचे समाधान व्यक्त केले आहे.





CMYK